दूरध्वनी क्र. (०२०) २५६५६२३४
Email ID : ropune@dtemaharashtra.gov.in

महाराष्ट्र शासन
# तंत्र शिक्षण विभागीय कार्यालय, पुणे
४१२ ई, शिवाजी नगर, पुणे - ४११ ०१६

**(कालमर्यादा : ३०.०४.२०२१ )**

जा.क्र . विकापु/लले/गोप/वागोअ/२०२०-२१/ ८७
दिनांक :- ०४/०३/२०२१

## परिपत्रक

विषय :- वार्षिक कार्यमूल्यमापन अहवाल २०२० - २०२१ बाबत ...
संदर्भ :- १. सामान्य प्रशासन विभागाचा शासन निर्णय क्र. सीएफआर १२१०/प्र.क्रं.४७/२०१०/तेरा दिनांक ०१/११/२०११
२. सामान्य प्रशासन विभागाचा शासन निर्णय क्र. सीएफआर १२११/प्र.क्रं.२१७/२०१०/तेरा दिनांक १७/१२/२०११
३. सामान्य प्रशासन विभाग, शासन निर्णय क्रमांक सीएफआर १२११/प्र.क्र. २५७/तेरा दिनांक ०२.०२.२०१७
४. सामान्य प्रशासन विभाग, शासन निर्णय क्रमांक सीएफआर-१२११/प्र.क्र.२५७/तेरा दिनांक ०७.०२.२०१८
५. या कार्यालयाचे परिपत्रक क्रमांक विकापु/लले/३६० feedback/२०२०/११९, दिनांक २३.०९.२०२०

या कार्यालयाच्या अधिपत्याखालील सर्व **अशासकीय अनुदानित** संस्थाप्रमुखांना सूचित करण्यात येते की, दिनांक ३१.०३.२०२१ रोजी त्यांच्या संस्थेच्या आस्थापनेवर कार्यरत असलेल्या सर्व शिक्षक व तृतीयश्रेणी कर्मचा-यांचे सन २०२०-२१ चे कार्यमूल्यमापन अहवाल लिहावयाचे आहेत. संस्थेतील सर्व शिक्षक व तृतीयश्रेणी कर्मचा-यांचे कार्यमूल्यमापन अहवाल तसेच चतुर्थश्रेणी कर्मचा-यांच्या कामाच्या मूल्यमापनार्थ टिपणे लिहून विहित कालमर्यादेत सादर करुन त्यांचे मूल्यमापन करुन घेण्याची जबाबदारी संस्थाप्रमुखांची आहे. **त्यानुसार कार्यवाही न केल्याने भविष्यात काही प्रशासकीय अडचण निर्माण झाल्यास त्यास संबंधित संस्थाप्रमुख जबाबदार राहतील याची गांभीर्याने नोंद घ्यावी.**

संस्थेतील सर्व शिक्षक, वर्ग ३ कर्मचारी व चतुर्थश्रेणी कर्मचा-यांचे कार्यमूल्यमापन अहवाल व टिपणे ही मागील वर्षाप्रमाणेच सुधारीत विवरणपत्रामध्ये (वर्ग ४ सोडून) भरावयाची आहेत. कार्यमूल्यमापन अहवाल/टिपणे उपरोक्त संदर्भाधीन शासन निर्णय क्रमांक १ सोबत जोडलेल्या परिशिष्ट अ मधील सूचनांप्रमाणे काटेकोरपणे अंमलबजावणी करुन योग्य पध्दतीने लिहावीत. संस्थेतील सर्व शिक्षक व तृतीयश्रेणी कर्मचा-यांचे सन २०२०-२१ (प्रतिवेदन कालावधी ०१.०४.२०२० ते ३१.०३.२०२१) कार्यमूल्यमापन अहवाल तसेच चतुर्थश्रेणी कर्मचा-यांची टिपणे लिहून दिनांक ३०.०४.२०२१ पर्यंत निश्चितपणे या कार्यालयास सादर करण्यास सूचित करण्यात येत आहे. सर्वांचे कार्यमूल्यमापन अहवाल/टिपणे लिहून **प्रत्येकी एका प्रतीत** विहित कालमर्यादेत मूल्यमापनार्थ सादर करण्याची दक्षता घ्यावी.

संस्थेचे अध्यक्ष/सचिवांनी प्राचार्यांचा कार्यमूल्यमापन अहवाल लिहून व्दिप्रतीत स्वतंत्रपणे विहित कालावधीत या कार्यालयास संस्करणासाठी सादर करावा.

तसेच संस्थेमधील अध्यापकांनी त्यांचे गोपनीय अहवाल भरण्यासाठी सादर करावयाच्या Self Appraisal Report च्या सोबतच, ३६० degree feedback score calculation sheet भरुन सादर करावे, जेणे करुन संस्था स्तरावर वार्षिक गोपनीय अहवाल भरुन घेणे व Calculation of ३६० degree feedback score बाबतची कार्यवाही एकाच वेळी पूर्ण करणे शक्य होईल.

( डॉ. दत्तात्रय व्यं. जाधव )
सहसंचालक,
तंत्रशिक्षण, विभागीय कार्यालय, पुणे

प्रत माहिती व आवश्यक त्या कार्यवाहीसाठी :

१. सर्व अशासकीय अनुदानित संस्थाप्रमुख, पुणे विभाग
२. प्रोग्रॅमर, संगणक विभाग, तंत्रशिक्षण, विभागीय कार्यालय, पुणे यांना तंत्रशिक्षण, विभागीय कार्यालयाच्या संकेतस्थळावर प्रसिध्द करणेसाठी